# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/६००/२०१६/३१

**(नोदंणी क्रमांक २०१६१०००४५ )**

तक्रार दाखल दिनांक :- २४.०८.२०१६
निकाल दिनांक :- ०७.१२.२०१६

श्री. संतोष गणपत ठोंबरे, तक्रारदार
मु. पो. तळणी, ता. सिल्लोड,
पिन कोड ४३१११२
जिल्हा औरंगाबाद
(ग्राहक क्रमांक ४९६७९०४२९५७१)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
ग्रामीण मंडल, औरंगाबाद.

## मंच

१ ) डॉ.भास्कर पालवे अध्यक्ष
२ ) श्री. उत्तम.म.उरकुडे सदस्य / सचिव
३ ) श्री. वि. सु काबरा सदस्य

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. संतोष गणपत ठोंबरे (ग्राहक क्रमांक ४९६७९०४२९५७१) यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता, नोडल अधिकारी, महावितरण, ग्रामीण मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द तक्रार अर्ज महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या अनुसूची -अ नमुन्यात केला आहे . तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अर्जदाराचे म्हणण्यानुसार मागील महिन्याचे रिडींग १३१८ असून चालू रिडींग १३५१ आहे. मला आज तारखेला बील रक्कम रुपये ४७५१.६३ असे आलेले आहे. तरी उपकार्यकारी अभियंता यांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराकडे मागील मिटरची बाकी आहे. अर्जदाराचे म्हणण्यानुसार मी ते घर विकले असून त्यासाठी २०-२५ वर्षे झाली आहेत व माझेकडे कोणतेही बील बाकी नसून या आधी मला कधीही नोटीस आली नाही किंवा कळविले नाही. तरी ही बाकी अर्जदारास मान्य नाही.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), महावितरण, ग्रामीण मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

दिनांक ०९.११.२०१६ व ३०.११.२०१६ रोजी खालील प्रमाणे आपले म्हणणे सादर केले.

१) श्री. गणपत विठोबा ठोंबरे रा. तळणी (ग्राहक क्रमांक ४९६७९०००२७६३) यांचे नावे असलेले वीज बील ग्राहकाला वर्ष २००३ ते २००५ या कालावधीत दरमहा जनमित्राच्या हस्ते देण्यात आले होते व थकीत वीज बील भरण्यासाठी वारंवार सांगण्यात आले. परंतु ग्राहकाने दिनांक १९.११.२००३ पासून माहे एप्रिल २००५ पर्यंत एकाही वीज बिलाचा भरणा केलेला नाही. करीता २००५ मध्ये ग्राहकाची वीज जोडणी कायम स्वरुपी खंडीत करण्यात आली व त्यानंतर वीज बील देण्यात आलेले नाही.

२) कायमस्वरुपी खंडीत थकबाकीदार ग्राहकाची तपासणी तत्कालीन सहाय्यक अभियंता, भराडी शाखा यांनी केली असता उपरोक्त ठिकाणी श्री. संतोष गणपत ठोंबरे (ग्राहक क्रमांक ४९६७९०४२९५७१) यांनी नवीन जोडणी घेतल्याचे आढळुन आले व त्यानुसार दिनांक १४.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कायमस्वरपी वीज पूरवठा खंडीत केलेल्या वीज ग्राहकाची

थकबाकी नवीन वीज ग्राहकावर वळती करण्याबाबत उपविभागीय कार्यालय, सिल्लोड यांनी कळविले व दिनांक ०४.०७.२०१६ रोजी जनमित्रामार्फत नोटीस देण्यात आली व थकबाकी माहे जुलै २०१६ च्या वीज बिलात समाविष्ट करण्यात आली.

३) महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग यांचे (वीज पूरवठा कोड आणि पूरवठा व इतर अटी) २०१० अन्वये परिच्छेद क्रमांक १७.८ नुसार मीटर घेतलेल्या जागेवर पुर्वीची थकबाकी असल्यास नवीन ग्राहकाने सदरील थकबाकी भरणे बंधनकारक आहे. दिनांक १८.११.२०१६ च्या अर्जात ग्राहकाने तक्रार दाखल केल्यानंतर नोटीस दिली हे साफ खोटे आहे.

४) ग्राहक मंचाने अर्जदारास थकीबाकी भरण्याचे आदेशित करावे व अर्ज फेटाळुन लावावा, अशी विनंती केली आहे.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष**

१) श्री. गणपत विठोबा ठोंबरे रा. तळणी (ग्राहक क्रमांक ४९६७९०००२७६३) हे उपरोक्त ग्राहकाचे नात्याने वडील असून त्यांचा विद्युत पुरवठा २००५ मध्ये कायम स्वरुपी खंडीत केलेला आहे व त्यानंतर वीज बील देण्यात आलेले नाही अथवा थकीत बिलाची मागणी केलेली नसतांना अचानकपणे माहे जूलै २०१६ ला श्री. संतोष गणपत ठोंबरे यांचे नावे असलेल्या ग्राहक क्रमांक ४९६७९०४२९५७१ वर रुपये ४६९०/- ची समायोजित रक्कम (थकबाकी) दर्शवुन सदर तक्रारकर्त्यास वीज बील दिले आहे.

२) विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ (२) मध्ये नमुद केले आहे की, "हे की, तेंव्हा तेंव्हा अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भुत असले तरी या कलमान्वये ग्राहकाकडुन येणे असलेली रक्कम, जर अशी रक्कम वीज पूरवठयाच्या आकाराची थकबाकी म्हणुन नियमितपणे वसुली योग्य असल्याची दाखविण्यात आली नसेल तर ज्यावेळी अशी रक्कम पहिल्यांदा येणे असेल त्या दिनांकापासून २ वर्षांचा अवधी वसुली योग्य असणार नाही व परवानादार विजेचा पूरवठा खंडीत करणार नाही" त्यामुळे २ वर्षानंतर ग्राहकाकडुन कोणतीही थकबाकी वसुल करता येत नाही.

वरील प्रमाणे ग्राहक व महावितरण यांनी सादर केलेले म्हणणे आणि ग्राहक निवारण मंचाचे निष्कर्ष यानुसार मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराची तक्रार मान्य करण्यात येत आहे.

२) अंतर्गत ग्राहक गाऱ्हाणे निवारण कक्ष, औरंगाबाद ग्रामीण मंडल यांचा आदेश दिनांक ०५.१०.२०१६ रद्द करण्यात येत आहे.

३) महावितरण यांनी श्री. गणपत विठोबा ठोंबरे रा. तळणी (ग्राहक क्रमांक ४९६७९०००२७६३) यांची थकबाकी वसुल करु नये.

४) आदेशाची अंमलबजावणी करुन ३० दिवसांचे आत अनुपालन अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |